**विशेष दिवाणी दवा क्र.११५७/२०१९**
**पुनम गायकवाड व इतर विरुध्द**
**छबन कामठे व इतर**
**CNR No. MHPU020048492019**

## <u>निशाणी क्रमांक ७९ वरील आदेश</u>

(आदेश दिनांक १९/११/२०२२)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्यातर्फे लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विंलब माफ करुन लेखी कैफियत अभिलेखावर घ्यावी याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ते ४ यांचे असे कथन आहे की प्रतिवादी दिनांक १६/०९/२०१९ रोजी सदर प्रकरणामध्ये हजर झालेले होते. प्रतिवादी क्र.१ हे वयोवृध्द असल्याने त्यांना विधाज्ञाना भेटून कागदपत्रांची पूर्तता करणे शक्य नव्हते. त्यामुळे ते विहीत वेळेत लेखी कैफियत दाखल करु शकले नाही. त्यानंतर कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे व टाळेबंदीमुळे न्यायालयीन कामकाज ठप्प झाले आणि त्यामुळे संबंधीत प्रतिवादी लेखी कैफियत दाखल करु शकले नाहीत. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना लेखी कैफियत दाखल करण्याची परवानगी झालेला विलंब माफ करुन मिळावा अन्यथा प्रतिवादी यांचे नुकसान होईल.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी लेखी म्हणणे दाखल केले की टाळेबंदीच्या पूर्वी प्रतिवादी यांनी लेखी कैफियत का दाखल केली नाही याचे कारण पुरेसे कारण दिलेले नाही. प्रतिवादी हे टाळेबंदीचा व एसओपी चा गैरफायदा घेत आहेत आणि सदर अर्ज नामंजूर करावा आणि जर न्यायालयाने विलंब माफ केला तर वादी यांना प्रतिवादीकडून भरीव कॉस्ट मिळावी.

३. प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. अर्जासंबंधाने प्रतिवादी यांचे अधिवक्ता यांचायुक्तीवाद ऐकला. त्यांनी

अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार युक्तीवादामध्ये केला. सदर अर्ज संबंधाने वादी यांचे अधिवक्ता यांनी युक्तीवाद केला. त्यांनी भरीव कॉस्ट प्रतिवादीवर लावावी असा युक्तीवाद केला. अर्जामधील दिनांक १६/०९/२०१९ ते १४/०३/२०२० या कालावधीमध्ये कोरानाचा कोणताही प्रादुर्भाव नव्हता.सदरचा कालावधी हा साधारणतः हा ६ महिनयाचा होता. सदरच्या ६ महिन्याच्या कालावधीमध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी लेखी कैफियत दाखल केलेली नाही. निश्चितपणे १५ मार्च २०२० नंतर कोरोनाचा प्रकोप होता आणि त्या अनुशंगाने मा. उच्च न्यायालयाने काही एसओपी न्यायालयीन कामकाजाकरीता जाहीर केलेली होती. मात्र प्रतिवादी हे कोरोना प्रभावाच्या पूर्वीच या प्रकरणात हजर झाले आहेत. या बाबीचा विचार करता व सदरचा दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीताचा विचार करता प्रतिवादी यांनी या प्रकरणी वादी यांना काही खर्च दयावा या अटीवर प्रतिवादीस लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे व प्रतिवादीस लेखी कैफियत दाखल करण्याची संधी देणे न्याय्य व योग्य वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

(१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

(२) प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादी यांना रुपये ३०००/- (रक्कम रुपये तीन हजार मात्र) खर्च दयावा. सदर खर्चाच्या रकमेपैकी २०००/- रुपये रक्कम शासन जमा करावी व १०००/- रुपये रक्कम वादी यांना दयावी. सदर कॉस्ट रक्कम प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी पुढील तारखेपर्यंत भरावी.

सही/-xxx

**(एस. एस. शिंदे)**

६वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, पुणे

पुणे

दिनांक १९/११/२०२२

**CERTIFICATE**

I Affirms that the contents of this PDF file Judgment are same word for word as per Original Judgment.

Name of Steno : Mr.K. V. Marathe (Stenographer-Grade II)

Court's name : Hon'ble S.S.Shinde, $6^{th}$Jt.Civil Judge S.D.Pune

Date of Judgment/Order : 19/11/2022

Judgment signed by Presiding officer on : 19/11/2022

Judgment/Order uploaded on : 21/11/2022